॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**
स्वत:ला कधीही कमी लेखू नका; तुमच्या आत्मविश्वासाने अशक्य गोष्टी सुद्धा शक्य होऊ शकतात.




अहमदनगर | शुक्रवार, दि. १७ मे २०२४ | वर्ष ५ वे | अंक ७३ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145


**पढेगाव-करंजी परिसराला अवकाळीचा तडाखा**
पान क्र. २ वर


**आधारभूत किंमत नसल्याने बाळहिरड्याला कवडीमोल भाव**
पान क्र. ३ वर


**जास्त वृक्षांमुळे संगमनेरकरांना उन्हाळ्यात मोठा दिलासा**
पान क्र. ४ वर

# ..तर ईडीला अटकेचा अधिकार नाही

## सुप्रीम कोर्टाची ईडीसंदर्भात टिप्पणी

**● नवी दिल्ली | वीरभूमी –**
राज्यासह देशात काही काळापासून दिग्गज राजकीय नेत्यांवर ईडीकडून कारवाई होताना दिसत आहे. ईडीची कारवाई सुरू असताना आरोप असलेले नेते स्वतः पक्ष सोडून भाजप किंवा सत्तेत असलेल्या पक्षात प्रवेश करताना दिसतात. त्यामुळे भाजपकडून ईडीचा दुरुपयोग करत असल्याचा आरोप विरोधकांकडून वारंवार होताना दिसतो. अशातच आता सर्वोच्च न्यायालयाने पीएमएलए कायद्यांतर्गत किंवा तरतुदीनुसार विशेष न्यायालयाने तक्रारीची स्वतःहून दखल घेतली असेल, तर ईडी आरोपीला अटक करू शकत नाही, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणातील आरोपीला जामिनासाठी दुहेरी खटला चालवावा लागतो का? या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाचा निकाल देण्यात आला आहे. विशेष न्यायालयाने गुन्ह्याची दखल घेतली असतानाही न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

ही सुनावणी न्या. अभय एस. ओक आणि न्या. उज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले की, जर मनी लॉन्ड्रिंग प्रकरणातील कोणत्याही आरोपीला ईडीने तपासादरम्यान अटक केली नसेल तर आणि पीएमएलए न्यायालयाने आरोपपत्राची दखल घेऊन जर त्याला समन्स बजावले, तर न्यायालयात हजर राहिल्यानंतर आरोपीला पीएमएलए अंतर्गत जामिनाची दुहेरी अट पूर्ण करण्याची गरज भासणार नाही. अशा परिस्थितीत ईडीला त्या आरोपीची कोठडी हवी असेल तर तपास यंत्रणेला न्यायालयाकडेच त्याच्या कोठडीची मागणी करावी लागेल. तसेच तपासाचे महत्त्व पटवून देऊन ईडीला भक्कम पुरावे करावे सादर करावे लागतील, तेव्हाच न्यायालय आरोपीचा ताबा ईडीकडे देईल. न्यायालयाने म्हटले की, पीएमएलएमध्ये जामिनासाठी दुहेरी अटीची तरतूद आहे, त्यामुळे आरोपींना जामीन मिळणे कठीण आहे. त्यामुळे जर आरोपी समन्सद्वारे (कोर्टाने जारी केलेला) विशेष न्यायालयासमोर हजर झाला, तर तो कोठडीत आहे असे मानता येणार नाही. तसेच समन्सनंतर जामिनासाठी



अर्ज करण्याची आवश्यकता नाही आणि अशा प्रकारे पीएमएलएच्या कलम ४५ च्या दुहेरी तरतुदी त्याला लागू होत नाहीत. दोन्ही अटींमध्ये असे नमूद केले आहे की, जेव्हा मनी लॉंडिंग प्रकरणातील आरोपी जामिनासाठी अर्ज करतो, तेव्हा न्यायालयाने प्रथम सरकारी वकिलाला सुनावणीची परवानगी दिली पाहिजे. यानंतर आरोपी दोषी नाही किंवा त्याला जामीन मिळाल्यास तो पुन्हा असा गुन्हा करणार नाही, असे समाधान जेव्हा न्यायालयाला वाटेल, तेव्हा आरोपीला जामीन मिळू शकतो, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## SPOT NEWS

### मुख्यमंत्र्यांच्या बॅगांची पोलिसांकडून झडती

**● नाशिक |** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे तपोवनातील निलगिरी बाग येथील हेलिपॅडवर आगमन झाले आणि एकनाथ शिंदे यांच्या बॅगांची तपासणी करण्यात आल्याने सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. काहीच दिवसांपूर्वी संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर पैसे वाटप केल्याचा आरोप केल्यानंतर ही तपासणी करण्यात आली आहे. दरम्यान, नाशिकमध्ये एकनाथ शिंदेंचा जो आधीचा दौरा होता त्यावेळी त्यांच्याकडे त्यात १२ कोटी होते, असा आरोप संजय राऊत यांनी केला होता. त्या बॅगा कुठे गेल्या? कुणाला दिल्या? कुठल्या हॉटेलात गेल्या असा सवाल राऊतांनी विचारला आणि शिंदेंवर गंभीर आरोप देखील केला. आता मुख्यमंत्र्यांच्या बॅगमध्ये कपडे, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंशिवाय काहीही सापडले नाही.

### उपमुख्यमंत्री अजित पवारांना घशाचे इन्फेक्शन

**● मुंबई |** पंतप्रधान नरेंद्र मोदी काल महाराष्ट्र दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी कल्याण आणि नाशिकमध्ये जाहीर सभा घेतली. तसेच मुंबईत त्यांचा रोडशोदेखील आयोजित करण्यात आला. मात्र, नाशिक किंवा कल्याणची सभा असो किंवा मुंबईतील रोडशो असो, अजित पवार हे कुठेही दिसून आले नाही. त्यामुळे अजित पवार नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. दरम्यान, अजित पवार यांच्या अनुपस्थितवावत आता राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. अजित पवार यांना घशाचे इन्फेक्शन झाले असून ते उद्यापासून पुन्हा प्रचारात दिसू लागतील, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. अजित पवार नॉटरिचेबल असले की ते नाराज आहेत, अशा बातम्या माध्यमांमध्ये दाखवल्या जातात. पण ते नॉटरिचेबलही नाही आणि नाराजही नाहीत. अजित पवार यांना निवडणुकीच्या कार्यकाळात घशाचे इन्फेक्शन झाले होते, असे सांगितले आहे.

## इंडिया आघाडीचे आज मुंबईत शक्तिप्रदर्शन; नेत्यांची उपस्थिती

**● मुंबई | वीरभूमी –**
महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या चार टप्प्यांतील प्रचाराचा धुरळा शांत झाल्यानंतर आता शेवटच्या पाचव्या टप्प्यातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराच्या निमित्ताने उद्या, शुक्रवारी इंडिया आघाडी मुंबईत शक्तिप्रदर्शन करणार आहे. वांद्रे-कुर्ला संकुलातील मैदानावर इंडिया आघाडीची जाहीर सभा होणार आहे. या सभेला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आदी नेते उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्रात पाचव्या टप्प्यातील १३ मतदारसंघांत २० मे रोजी निवडणूक होणार आहे. यामध्ये मुंबईतील सहा मतदारसंघांचा समावेश आहे. त्यानिमित्त महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ ही सभा होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस हे नकली पक्ष असल्याचे वक्तव्य करत त्यांची खिल्ली उडवली होती. त्यामुळे उद्या होणाऱ्या या सभेच्या माध्यमातून इंडिया आघाडीचे नेते पंतप्रधान मोदी तसेच महायुतीच्या नेत्यांना काय प्रत्युत्तर देणार, याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## राजूर नजिक जीप पलटी; तरुणाचा मृत्यू

**● अकोले | वीरभूमी –**
कोल्हार घोटी रस्त्यावरील राजूर जवळील केळुंगण शिवारात जीप पलटी होऊन झालेल्या अपघातात निहाल संतोष रूपवते (वय १९, रा. अकोले) हा युवक जागीच ठार झाल्याची घटना गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली.

या बाबत राजूर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मयत रूपवते हा अकोले तालुक्यातील रंधा येथे आपल्या नातेवाईकांच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी आला होता. यानंतर तो आपल्या चार मित्रांसह एमएच ०५, एएक्स ०८६५ ही जीप घेवून रंधा येथून राजूर येथे गाडी धुण्यासाठी घेवून येत होते. येत असताना केळुंगण शिवारात गाडी आल्यानंतर तिची स्टिअरिंग लॉक झाली आणि जीप पलटी झाली. यात



मयत रूपवते हा युवक गाडी खाली सापडला आणि त्याचा मृत्यु झाला.

घटनेची माहिती समजताच राजूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक सरोदे आपले कर्मचारी अशोक गाडे, विजय मुंढे, राकेश मुळाणे यांच्या सह घटना स्थळी दाखल झाले. पंचनामा करून मयत रूपवते याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी राजूर येथील ग्रामीण रुग्णालयात आणला होता. राजूर पोलीस ठाण्यात या घटनेचा गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. निहालचे वडील संतोष रुपवते हे अकोले नगरपंचायत मध्ये नोकरीला आहेत.

# मोदींचा आत्मविश्वास हरवला : शरद पवार

## राज ठाकरेंचे राजकारणातील स्थान माहीत नसल्याचा टोला

**● नाशिक | वीरभूमी –**
पंतप्रधान आत्मविश्वास नरेंद्र मोदींचा हरवला आहे. त्यामुळेच ते प्रचार सभांतील भाषणांतून जात, धर्मावर बोलत आहेत, अशी टीका राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर केली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात राज ठाकरे यांचे नक्की काय स्थान आहे हे माहीत नाही, अशी खोचक टीका करत पवार यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला आहे.



महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ नाशिक दौऱ्यावर आलेल्या शरद पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पिंपळगाव बसवंत येथे झालेल्या सभेत केलेल्या आरोपांचा पवार यांनी जोरदार समाचार घेतला. अर्थसंकल्पाचे विभाजन करून १५ टक्के अर्थसंकल्प मुस्लिम समाजासाठी राखीव ठेवायचा, असा काँग्रेसचा डाव असल्याचा दावा नरेंद्र मोदी यांनी केला होता. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पवार म्हणाले की, संसदेत मांडला जाणारा अर्थसंकल्प हा देशाचा असतो. अर्थसंकल्प कधीही एका जाती- धर्माचा असू शकत नाही. पंतप्रधान मोदी यांच्याकडे प्रचारात सांगण्यासारखे दुसरे काहीही नसल्यामुळे ते लक्ष वळविण्याचा प्रयत्न करत आहेत, असे पवार म्हणाले.

### मोदींना मी इस्त्रायलला नेले...

■ मी कृषिमंत्री असताना काय केले, असे पंतप्रधान मोदी विचारत आहेत; पण मी कृषिमंत्री असताना पंतप्रधान मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते. मी माझ्याबरोबर त्यांना इस्रायलला घेऊन गेलो. इस्रायलमध्ये मी मोदींना चार दिवस फिरवले, शेतीचे नवे तंत्रज्ञान त्यांना दाखवले. त्यावेळी मोदींना राज्याच्या विकासात मनापासून रस होता; पण हल्ली त्यांना फक्त राजकारणात रस आहे, असा आरोप पवार यांनी यावेळी केला.

### होय, अजित पवार खरोखर आजारी!

■ बारामती मतदारसंघातील मतदान पार पडल्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार आहेत कुठे, असा प्रश्न विचारला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यात तसेच महायुतीच्या प्रचाराला त्यांची गैरहजेरी दिसत आहे. यावरून विविध वावड्या उठल्या असताना आता शरद पवारांनीही यावर भाष्य केले आहे. पवार यांना याबाबत प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, बारामतीचे मतदान झाल्यापासून अजित पवार खरेच आजारी आहेत, अशी माझी माहिती आहे. त्यामुळे ते कुठे दिसत नसावेत, अशी टिपणी त्यांनी केली.

## मनोज जरांगेंची ८ जून रोजीची नारायण गडावरील सभा रद्द

**● जालना | वीरभूमी –**
मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा ४ जूनपासून आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू करणार असल्याची घोषणा आहे. तसेच जरांगेंची ८ जून रोजी नारायण गडावर सभा होणार होती. मात्र, बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळाचे सावट आहे. त्यामुळे पाणी उपलब्ध नाही. तसेच उन्हाची तीव्रता देखील जास्त आहे. त्यामुळे एकत्र येणाऱ्या मराठा बांधवांची गैरसोय नको, यासाठी नारायण गडावरील सभा रद्द करण्यात आली आहे. आता पुढील सभा कधी होणार? याचा निर्णय अद्याप झालेला नाही. मात्र, तूर्तास आठ जून रोजीची सभा रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

मराठा आंदोलनाच्या माध्यमातून जरांगे यांनी सगेसोयरेची मागणी पुन्हा एकदा करत असल्याचे सांगितले जात आहे. यादरम्यान जरांगेंनी भाजपवर देखील निशाणा साधला आहे. मराठ्यांमुळे मोदींना महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सभा घ्याव्या लागल्या. त्यामुळेच मोदी गोधड्या टाकूनच महाराष्ट्रात होते. मोदींवर ही वेळ फडणवीस आणि त्यांच्या चार-पाच लोकांमुळे आली असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच पुन्हा एकदा तीव्र आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिलेला आहे.

भारतीय जनता पक्षाच्या विरोधात आम्ही नाही. मात्र, जोपर्यंत सगेसोयरे आणि ओबीसी मराठा एकच असल्याचा अध्यादेश निघत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरू राहणार असल्याचे जरांगे यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर तसा निर्णय झाला नाही तर येणारी विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे देखील त्यांनी जाहीर केले आहे.

SPOT NEWS

## शंकर सावली मठात हनुमान चालिसा संपन्न

**● नगर । वीरभूमी –**

नगरमधील माळीवाडा येथील ब्राह्मण गल्लीतील शंकर सावली मठात शंकर महाराजांच्या ७७ वा समाधी सोहळ्या निम्मित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे त्यामध्ये श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट प्रस्तुत हनुमान चालीसा व भजनसंध्या कार्यक्रम संपन्न झाला. मठासमोर आयोजलेल्या या सामुहिक हनुमान चालीसा पाठ संपन्न झाली व भजन संध्याने शंकर महाराजांच्या नामाने परिसर दुमदुमन गेला होता यावेळी हनुमान चालीसाच्या गायनाने कार्यक्रमात रंगला. तर भाविकांनी सामुदायिक पठणात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व भजन संध्यात भाविक तल्लीन झाले होते. विविध देवतांची स्तुतीपर भजने संपन्न झाली या कार्यक्रमास मोठ्या संख्नेने शंकर भक्त ,परिसरातील भाविक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व राजकीय नेते कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते. हनुमान चालीसा कार्यक्रमानंतर सर्व भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली ४ दिवसीय या कार्यक्रमात सामुदायिक शंकर गिता पारायण सोहळासंपन्न झाला दुसऱ्या समाधी दिनी पालखी छबिना सोहळा होणार असून गुरुवारी संध्याकाळी महाप्रसाद म्हणून आगडगाव ची आमटी व भाकरीचे जेवण ठेवण्यात आले आहे. तरी भाविकांनी सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मठाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाब विचारल्याने बाप-लेकीला मारहाण

**● नगर । वीरभूमी –**

मुलीला त्रास दिल्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या बापाला व मुलीला पाच जणांनी मारहाण केल्याची घटना चास शिवारात घडली. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केडगाव उपनगरातील एकनाथनगरमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने याप्रकरणी फिर्याद दिली आहे. सागर बाजीराव जाधव, बाजीराव रामभाऊ जाधव, अलका बाजीराव जाधव, बाबुराव बाजीराव जाधव, मनिषा बाबुराव जाधव (सर्व रा. चास) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी १३ मे रोजी दुपारी जाधव कुटुंबाच्या चास येथील घरी गेले होते. फिर्यादी यांनी सागरला 'माझ्या मुलीला का त्रास देतो' असे विचारले असता राग आलेल्या सागरने त्यांना शिवीगाळ केले. त्याचवेळी तेथे बाजीराव आला त्याने फिर्यादीचे हात पकडले. सागरने दगडाने, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. अलकाने लोखंडी खुरपे फिर्यादीच्या कानाच्या पाठीमागे मारले. बाबुराव याने लाकडी काठीने मारहाण केली. दरम्यान फिर्यादीची मुलगी सोडविण्यासाठी आली असता तिला देखील अलकाने लोखंडी खुरप्याने व मनिषाने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## श्रीरामपूर शहरात तरुणावर कत्तीने प्राणघातक हल्ला

**● श्रीरामपूर । वीरभूमी –**

शहरातील नेवासा रोड वरील आयडीबीआय बँकेसमोर एका तरुणावर तीन जणांनी कत्तीच्या साह्याने वार करून प्राणघातक हल्ला केला. ही घटना काल बुधवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास घडली. श्रीरामपूर शहरातील नेवासा रोड वरील आयडीबीआय बँक परिसरात राहणारा विशाल साळवे याच्यावर तीन जणांनी कत्तीच्या साह्याने वार केले. यामध्ये सदर तरुण गंभीर जखमी झाला.

# पढेगाव-करंजी परिसराला अवकाळीचा तडाखा

## झालेल्या नुकसानीची आ. आशुतोष काळेंनी पाहणी करून तहसीलदारांना पंचानाम्याच्या दिल्या सूचना

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पाऊस व सोसाट्याच्या वादळामुळे पढेगाव-करंजी गावात अनेक नागरिकांच्या घरांचे पत्रे उडून नागरिकांचे संसार उघड्यावर पडले आहेत तर चाळीत साठवलेल्या कांद्याचे देखील नुकसान झाले आहे. अनेक झाडे उन्मळून पडल्यामुळे विजेचा प्रवाह देखील खंडीत होवून विजेच्या पोलांचे व वीज वाहिन्यांचे देखील मोठे नुकसान झाले आहे.याबाबतची माहिती मिळताच आ. आशुतोष काळे यांनी झालेल्या नुकसानीची पाहणी करून तहसीलदारांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यात विविध ठिकाणी अवकाळी पाऊस पडत असून त्यामुळे अनेक ठिकाणी नुकसान देखील होत आहे. यातून कोपरगाव तालुका देखील सुटला नसून मागील दोन दिवसापासून कोपरगाव तालुक्यात अवकाळी पाऊस व वादळामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून वीज पडल्यामुळे काही जनावरे देखील दगावली आहे. अशातच सलग दुसऱ्यांदा गुरुवार (दि.१६) रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास पढेगाव-करंजी गावात अवकाळी गारांचा पाऊस व झालेल्या वादळामुळे अनेक घरांचे मोठे नुकसान होवून यात दोन महिला देखील जखमी झाल्या असून त्यांना कोपरगाव शहरातील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांच्या कांदा चाळीचे देखील नुकसान होवून साठवून ठेवलेल्या कांद्याचे नुकसान झाले आहे.

सदर घटनेची आ. आशुतोष काळे यांनी स्वत: जातीने पाहणी करून झालेल्या नुकसानीचा आढावा घेत नुकसानग्रस्त नागरिकांची व शेतकऱ्यांची भेट घेवून त्यांचे सात्वन केले आहे. तसेच तहसीलदार संदीपकुमार भोसले यांना मदत पुनर्वसन विभागाला झालेल्या घटनेची माहिती पाठवावी अशा सूचना देवून झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त नागरिकांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## भरबाजारपेठेत तरुणाला बेदम मारहाण

**● नगर । वीरभूमी –**

शिवसेना शिंदे गटाचे संपर्कप्रमुख सचिन जाधव यांच्यावर झालेल्या हल्ल्याची घटना ताजी असतांनाच गुरुवारी पुन्हा भर बाजारपेठेत तेलीखुंट येथे तरुणावर टोळक्याने हल्ला करून बेदम मारहणा केल्याची घटना सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत प्रशांत काळे (रा. मंगलगेट, नगर) हा तरुण जखमी झाला असून त्याला उपचारार्थ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जाधव यांच्यावरील हल्ल्याच्या वादातूनच हा हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आमची गाडी फोडतो काय, असे म्हणत टोळक्याने हल्ला केला. या प्रकरणी चार जणांविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी सांगितले.

मयूर राऊत, बारक्या (पूर्ण नाव, पत्ता नाही) व इतर दोन अनोळखी यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. लोकसभा निवडणूक मतदानाच्या आदल्या दिवशी मंगलगेट परिसरात दोन गटात राडा झाला होता. यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले असून, त्यात राऊत व काळे यांच्यावरही गुन्हा दाखल झालेला आहे. याच वादातून गुरुवारी पुन्हा प्रशांत काळे या तरुणावर चार जणांच्या टोकळ्याने हल्ला केला. काळे हे त्यांच्या टेम्पोतून जात असताना दोन दुचाकीवर आलेल्या चौघांनी त्यांच्या टेम्पोला गाडी आडवी लावून टेम्पो थांबवला. काळे यांना बाहेर काढून दांडक्याने मारहाण केली. टोळक्याने हातात दांडके घेऊन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्नही बाजारपेठेत केला. अचानक घडलेल्या या घटनेने बाजारपेठेत खळबळ उडाली आहे. हल्लेखोरांनी त्यांच्या टेम्पोचीही तोडफोड केली. दोन दिवसांपूर्वी झालेल्या वादात काळे यांनी गाडीची तोडफोड केल्याने त्याचा बदला म्हणून त्यांना मारहाण करत त्यांच्या टेम्पोची तोडफोड करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिस घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. त्यानुसार कोतवाली पोलिस हल्लेखोरांचा तपास करीत आहेत.

## श्रीरामपूर शहरात १८ फ्लेक्स बोर्ड विनापरवानगी; पालिकेकडून नोटीसा

**● श्रीरामपूर । वीरभूमी –**

नगरविकास मंत्रालयाकडून आदेश आल्यानंतर श्रीरामपूर नगरपालिकेने आता अनधिकृत होर्डिंगवर कारवाईचा बडगा उगारला आहे. श्रीरामपूर शहरात अशा पद्धतीच्या १८ होर्डिंग असून एकाकडेही अधिकृत परवानगी नाही. शहरातील या १८ अनधिकृत होर्डिंगसाठी संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या असून त्यांच्याकडून स्ट्रक्चरल ऑडिट प्रमाणपत्रही मागविण्यात आल्याची माहिती नगरपालिका मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांनी दिली.



मागविलेल्या माहितीमध्ये काही त्रुटी आढळून आल्यास सबंधित होर्डिंग काढून टाकण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल, असेही जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यात घाटकोपर, ठाणे येथे होर्डिंग्ज कोसळून अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यानंतर आता यानंतर नगरविकास खाते ॲक्शन मोडवर आले आहे. श्रीरामपूर शहरासह ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी मनमानी पद्धतीने वाटेल तेथे अशी होर्डिंग व मोठमोठे फ्लेक्स लावले जातात. यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असल्याने अशा प्रकारच्या होर्डिंग व फलकाना परवानगी देऊ नये, अशी मागणी नागरिकांतून केली जाते. मात्र, सर्व नियम धाब्यावर बसवून होर्डिंग अथवा फलक लावले जातात. शिवाय वर्षांनुवर्षे ते काढलेही जात नाहीत. आता घाटकोपर ठाणे येथे होर्डिंग कोसळून दुर्घटना घडल्याने नगरविकास खात्याला जाग आली आहे.

त्यामुळे राज्यातील सर्व नगरपालिकांना आदेश देण्यात आले आहेत. आदेश आल्यानंतर श्रीरामपूर नगरपालिकेनेही शहरातील होर्डिंगची तपासणी केली असता १८ होर्डिंग्ज आढळले असून यापैकी एकालाही नगरपालिकेची परवानगी नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या सर्वांवावर नगरपालिका काय कारवाई करते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. नगर महापालिकेसह नगरपालिका, नगरपरिषदेच्या ठिकाणी असणारे अनाधिकृत होडिंग्ज हटविण्यासंदर्भात आदेश देण्यात आले असून, लवकरच हे होडिंग्ज हटविण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# भारतीय लोकशाही धोक्यात व शेतकऱ्यांचे भवितव्य संकटात

## कॉ. भालचंद्र कांगो । कॉ. ॲड. शांताराम वाळुंज यांच्या स्मृती प्रित्यर्थ 'लाल वादळ' या स्मरणिकेचे प्रकाशन

**● अकोले । वीरभूमी –**

शेतकरी आणि त्यांना मिळणारा भाव आणि त्यांचं भवितव्य यांच्याशी भारतीय राज्यकर्त्यांची फारकत झालेली आहे म्हणून भारतीय लोकशाही धोक्यात व शेतकऱ्यांचे भवितव्य संकटात आले असल्याची टीका भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव कॉ. भालचंद्र कांगो यांनी केली. जोपर्यंत संघर्ष व चळवळ जीवंत आहे तोपर्यंत भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे स्थान चिरकाल टिकेल असा विश्वासही कॉ. कांगो यांनी व्यक्त केला.

अकोले तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी, विडी कामगार, विद्यार्थी चळवळीतील लढवय्ये कम्युनिस्ट नेते कॉ. ॲड. शांताराम वाळुंज यांच्या स्मृती प्रित्यर्थ 'लाल वादळ' या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव कॉ. भालचंद्र कांगो यांच्या शुभहस्ते आज पंकज लॉनस येथे पार पडला. यावेळी कॉ.कांगो बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विडी, सिगार फेडरेशन राष्ट्रीय अध्यक्ष कॉ. कारभारी वाळुंज होते.

कॉ. भालचंद्र कांगो म्हणाले की, अकोले तालुका हा लढाऊ व क्रांतिकारी तालुका आहे. जनतेच्या चळवळीशी कॉ. शांताराम वाळुंज यांनी बांधून घेतले होते. ज्या तत्वज्ञानावर विश्वास ठेऊन ते काम करत होते त्याच तत्वज्ञानाप्रमाणे व्यवहार व्हावा यासाठी दक्ष होते. त्यांनी लाल बावट्याशी शेवटच्या श्वासापर्यंत बांधीलकी ठेवली. त्यामुळेच सर्वपक्षीय कार्यकर्ते व लोक इथे एकत्रित आले आहेत. इमरजन्सीच्या काळामध्ये सरकारची मते मान्य नसल्यामुळे अनेक जण जेलमध्ये गेले. परंतु कुणालाही देशद्रोही म्हणण्यात आले नाही. आता जेलमध्ये न पाठवता आपल्या विरोधात बोलला, त्यांना देशद्रोही म्हणण्याची नवीन संस्कृती निर्माण झाली आहे, असे कॉ. कांगो यांनी सांगितले.

किसान सभेचे केंद्रिय सह सचिव डॉ. अजित नवले म्हणाले की, कॉम्रेड वाळुंज हे अंतर्बाह्य आपल्याला एकसंघ वाटायचे. ते जसे आत होते तसेच ते बाहेर होते. याची सारखी प्रचिती यायची. माणूस जेव्हा जे आत असतो तसाच तो बाहेर असतो, तेव्हा त्याच वक्तृत्व स्वाभाविकरीत्या खुलत असतं. श्रमिकांबरोबरची अत्यंत सचोटीची अशा प्रकारची निष्ठा ते बाळगू शकले कारण खऱ्या अर्थाने ते अंतर्बाह्य कम्युनिस्ट आणि मार्क्सवादी होते.

अगस्ती साखर कारखान्याचे अध्यक्ष सीताराम गायकर यांनी कॉम्रेड वाळुंज यांचे वक्तृत्व अत्यंत हृदयस्पर्शी होते असे सांगत तालुक्यात पाण्याची चळवळ, मीटर हटाओ चळवळ अशा अनेक चळवळी झाल्या. त्यावेळी शांताराम वाळुंज हे सर्व चळवळीत अग्रभागी असायचे अशा शब्दात गायकर यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

कॉ.शांताराम वाळुंज यांच्या स्मृती जाग्या ठेवण्यासाठी अकोलेत महाविद्यालयीन युवकांसाठी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्याची सूचना शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी केली.

अध्यक्षीय भाषणात कॉ. कारभारी उगले यांनी विचारांशी एकनिष्ठ असणारा कार्यकर्ता, आचार विचार आणि व्यवहार समोर ठेऊन जीवन जगणारा एक निर्मळ अंतकरणचा माणुस जाण्याने अतिशय दुःख होत असल्याचे सांगितले.

यावेळी कु.श्रेया आरोटे, ज्येष्ठ साहित्यिक शांताराम गजे, आरपीआयचे राज्य सचिव विजयराव वाकचौरे, कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे, ज्येष्ठ नेते कॉ. प्रा. राम बाहेती, दशरथ सावंत, आ. डॉ. किरण लहामटे आदींनी कॉ. शांताराम वाळुंज यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाशझोत टाकणारी भाषणे झाली. नात कू.श्रेया आरोटे हिने आजोबा स्वर्गीय वाळुंज यांच्याशी पत्राद्वारे साधलेल्या हृदयस्पर्शी सवांदामुळे उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रु तरळले.




प्रास्ताविक व स्वागत स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते मधुकरराव नवले यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. वसंतराव मनकर यांनी केले. तर आभार भास्करराव वाळुंज यांनी मानले. माजी आमदार वैभवराव पिचड यांनीही कॉ. वाळुंज यांना प्रारंभी आदरांजली अर्पण केली.

यावेळी ज्येष्ठ नेते गिरजाजी जाधव, कैलासराव वाकचौरे, कॉ. आर. डी. चौधरी, विनय सावंत, अमित भांगरे, बी. जे. देशमुख, प्रा.बबनराव महाले, कॉ.लक्ष्मण नवले, प्रा. विलास नवले, कॉ. आनंदराव नवले, विठ्ठलराव चासकर, प्रकाश टाकळकर, दिपक महाराज देशमुख, सुधाकरराव देशमुख, महेशराव नवले, यशवंतराव आभाळे, अमोल वैद्य, बाळासाहेब भोर, मच्छिंद्र धुमाळ, संदीप शेटे, कैलास शेळके, रावसाहेब वाळुंज, मंदाताई नवले, नगरसेविका शीतल वैद्य, प्रतिभा मनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

SPOT NEWS

## चास येथील सिमेंट कंपनी फोडून सव्वा सहा लाखांचा ऐवज लांबविला

**नगर । वीरभूमी –**




चास (ता. नगर) शिवारातील विठ्ठल अॅण्ड आरएमसी रेडीमेंट सिमेंट काँक्रिट कंपनी फोडून चोरट्यांनी तेथील मशनरीचे सहा लाख २३ हजार ३०९ रुपये किमतीचे सात पार्ट चोरून नेले आहेत. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. कंपनीचे मॅनेजर संदीप नाना कार्ले (वय ४१ रा. चास) यांनी फिर्याद दिली आहे. चास शिवारात विठ्ठल अॅण्ड आरएमसी रेडीमेंट सिमेंट काँक्रिटची कंपनी आहे. त्या कंपनीत सिमेंटचे ब्लॉक तयार होतात. ते तयार करण्यासाठी तेथे मशिनरी आहे. १३ मे रोजी सायंकाळी साडेसात वाजता कंपनी बंद करण्यात आली होती. त्यानंतर चोरट्यांनी कंपनी फोडून त्यातील मशिनरीचे सहा लाख २३ हजार ३०९ रुपये किंमतीचे सात इलेक्ट्रीक पार्ट चोरून नेले. हा प्रकार दुसऱ्या दिवशी १४ मे रोजी सकाळी नऊ वाजता लक्षात आला. याची माहिती नगर तालुका पोलिसांना देण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी पथकासह कंपनीला भेट दिली. मॅनेजर कार्ले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान कंपनीतील पार्ट चोरीबाबतची माहिती कंपनीतील कामगाराला माहिती असल्याचा पोलिसांचा संशय आहे. पोलीस त्या दृष्टीकोनातून तपास करत असल्याचे सहायक निरीक्षक गिते यांनी सांगितले.

## परवानगी नसलेले फ्लेक्स हटवण्याचे मनपाचे आदेश

**नगर । वीरभूमी –**

मुंबई येथे होर्डींग पडून १४ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडल्यानंतर नगर महापालिकेला जाग आली आहे. नगर शहरात प्रमुख रस्त्यांलगत, खासगी इमारतींवर उभारण्यात आलेल्या सर्व होर्डींगची तपासणी करण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक डॉ. पंकज जावळे यांनी दिले आहेत. अतिक्रमण निर्मूलन विभाग व महापालिका उपायुक्तांमार्फत शहरातील सर्व होर्डिंगचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. ज्या होर्डिंगला परवानगी नाही, तसेच होर्डींग धोकादायक वाटत असेल, असे होर्डिंग हटवण्यात येतील. नियमानुसार परवानग्या दिलेल्या नसतील तर अशा परवानगी रद्द केल्या जातील अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक डॉ. जावळे यांनी दिली. दरम्यान, दोन दिवसांत सर्वेक्षणाचा अहवाल देण्यात येणार असून, त्यानंतर निर्णय घेतला जाणार आहे. मुंबई येथे वादळामुळे मोठा जाहिरात फलक पडून १४ जणांचे बळी गेले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर नगर शहरात असलेल्या होर्डिंगची तपासणी सुरू करण्यात आली आहे. मनपाकडे अवघ्या ३८४ होर्डिंगची नोंद उपलब्ध आहे. जाहिरात फलकांबाबत राज्य शासनाने सन २०२२ मध्ये जारी केलेले नियम डावलून प्रमुख चौकात व रस्त्यालगत मोठ्या जाहिरात फलकांना महापालिकेकडून परवानगी देण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासक डॉ. जावळे यांनी शहरातील सर्व होर्डिंगची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. यात परवानगी असलेल्या व नसलेल्या सर्व होर्डिंगचे सर्वेक्षण केले जाणार आहे. नियमानुसार परवानग्या नसल्यास अशा परवानगी रद्द करण्यात येणार आहेत. तसेच अनधिकृत होर्डिंगबाबत सर्वेक्षणाचा अहवाल येताच कारवाई हाती घेण्यात येणार असल्याचे प्रशासक डॉ. जावळे यांनी सांगितले.

# आधारभूत किंमत नसल्याने बाळहिरड्याला कवडीमोल भाव

### स्थानिक व्यापाऱ्यांकडून लूट । आधारभूत किंमतीसाठी शासनाचे लक्ष वेधले

**अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील आदिवासी भागात बाळहिरडा हा एक आर्थिक उत्पन्नाचे प्रमुख स्रोत आहे. आदिवासी भागातील शेतकरी आपल्या शेतातील बाळहिरडा व इतर औषधी वनस्पती गोळा करत त्याची बाजारात विक्री करुन आपली व आपल्या परिवाराची गरज भागवतात. त्यांनी गोळा केलेल्या बाळहिरड्याला भाव मिळत नाही.

स्थानिक व्यापारी तो कमी भावाने खरेदी करतात. आदिवासी विकास मंडळ विभागाने यावर्षी हिरड्याला १७० रुपये दर जाहीर केला आहे. बाळहिरडा हा आदिवासी भागातील उन्हाळ्यातील आर्थिक उत्पन्नाचा एक मुख्य स्रोत आहे. याला शासनाने आधारभूत भाव न ठरवल्याने स्थानिक व्यापारी कमी भावाने खरेदी करत असून, आदिवासी समाजाची लूट करत आहेत.

हाच बाळहिरडा हा आदिवासी विकास महामंडळ विभागाने १७० रुपये दराने खरेदी करण्यासाठी प्रयत्न करून आदिवासी समाजाला आर्थिक बळ देण्यासाठी तात्काळ कार्यवाही व उपाययोजना राबविली आहे. यासाठी शेतकऱ्यांनी महामंडळाकडे नावनोंदणी करण्यास सांगितले आहे.



परंतु, तोडलेल्या बाळहिरड्याची रक्कम वेळेत मिळते की नाही यामुळे या परिसरातील शेतकरी स्थानिक व्यापाऱ्यांना कमी भावात विक्री करून आपली गरज भागवत आहेत. याचाच फायदा घेत स्थानिक व्यापारी बाळहिरडा खरेदी करताना आदिवासी जनतेची लूटमार करतात. शासनाने याची दखल घेऊन बाळहिरडा खरेदी करावा, आदिवासी विकास विभागाने खरेदी-विक्री चालू करावी. बाळहिरडा हे आर्थिक उत्पनाचे साधन असून, पावसाळ्यापूर्वी चार पैसे जमा करून यातून खत, बियाणे व चार महिन्यांची मीठ मिरचीची सोय आदिवासी समाज करत असतो.

यावर्षी मागील महिन्यात झालेल्या वादळाचा तडाखा या फळाला देखील बसला आहे. यामुळे बाळहिरड्याचे प्रमाण कमी आहे. बाळहिरडा हा अनेक आजारांवर रामबाण औषध आहे. यामुळे बाळहिरड्याला दोनशे रुपयांच्यावर भाव मिळावा, अशी मागणी होत आहे.

### जोखमीचे काम

उन्हाळ्यातील मार्च, एप्रिल, मे या महिन्यांत आदिवासी शेतकरी जंगली हिरडा, बेहडा व इतर वनस्पती गोळा करतात. परंतु, यामध्ये हिरडा हे उत्पादनाचे मुख्य फळ आहे. हिरडा गोळा करण्यासाठी दिवसभर उन्हाची पर्वा न करता जोखिम पत्करुन झाडावर चढून तोडावा लागतो. बाळहिरडा गोळा करताना झाडावरून पडल्याच्या अनेक घटना घडत असतात. तर काहींना कायमचे अपंगत्व येते. काहींना प्राणाला मुकावे लागते.

### शासनाकडे वेधले लक्ष

समाजसेवक अनंत घाणे यांनी आदिवासी विकास महामंडळाने बाळहिरडा खरेदी करावा. व्यावसायिक व्यापारी यांच्याकडुन लूट होत आहे. बाळ हिरड्याला १७० रू. भाव असताना व्यापारी १५० रुपये किलोने खरेदी करतात. याकडे शासनाचे लक्ष वेधले असून ऑनलाइन मिटिंग करून शासनाने महामंडळाच्या माध्यमातून बाळहिरडा खरेदी करावा, अशी मागणी केली आहे. अनंत घाणे हे गेल्या दोन वर्षापासून यासाठी पाठपुरावा करीत आहे.

## साधूसंतांची शिकवण आचरणात आणताना अंतकरण आनंदीत होते :लुणिया

**नगर । वीरभूमी –**

ग्रामीण भागात आजही दळणवळणासाठी सायकलींना महत्व आहे. शाळा, महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी, रोजगारासाठी जाणारे अनेक जण पायी येजा करतात. अशा गरजवंतांना सायकलरूपी मदत मोलाची ठरणारी आहे. सायकल मिळाल्याने त्यांच्या रोजच्या जीवनातील पायपीट कमी होईल. वेळ वाचल्याने विद्यार्थी तो वेळ अभ्यासासाठी देऊ शकतील. गरजूंचे जगणे सुसह्य करणे हीच खरी मानवता आहे. साधूसंतांनी दिलेली हीच शिकवण सायकल वाटप उपक्रम राबविताना आचरणात आणली याचा विशेष आनंद आहे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील अनिल लुणिया यांनी केले. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने व प्रबुध्द विचारक पूज्य आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेने जैन सोशल फेडरेशच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर येथील लुणिया परिवाराने स्व.उमरावदेवी पारसमलजी लुणिया यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गरजूंना १०८ सायकल वाटप करण्याचे जाहीर केले होते. आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी २८ मार्च २०२४ ला हा संकल्प करण्यात आला होता. त्यानुसार अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर नगर, तिसगाव, चिचोंडी, मिरी, कडा येथील गरजूंना सायकलीचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी सौ.रशिला लुणिया, अनिल लुणिया, डॉ.अंश लुणिया, जैन सोशल फेडरेशनचे सतीश (बाबूशेठ)लोढा, निखिलेंद्र लोढा, प्रकाश छल्लानी, अजित कर्नावट, सुनील मालू यांच्यासह लुणिया परिवारातील सदस्य उपस्थित होते.

लुनिया परिवाराला या उपक्रमासाठी जैन सोशल फेडरेशने नियोजन करून दिले. लाभार्थींकडून अर्ज मागविणे, त्यांची छाननी करणे, खऱ्या गरजूला लाभ मिळेल यादृष्टीने सर्व व्यवस्था पाहण्यात आली. त्यानुसार १०८ लाभार्थींची यादी अंतिम करण्यात आली. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर संबंधित लाभार्थींना सायकलींचे वितरण करण्यात आले.

## ज्यांनी आपल्या मनाला समजावलं त्यांचाच या जगात सन्मान होतो : परमानंद गिरी महाराज

**कोपरगाव । वीरभूमी –**

जगाला उपदेश करणे सोपे आहे परंतु आपल्या मनाला उपदेश करणे अवघड असते.या जगात ज्यांनी आपल्या मनाला समजावलं त्यांचाच समाजात मान,सन्मान आणि पूजन होते. ते त्रीलोक्याचे स्वामी होतात.जे आपल्या मनाचे गुलाम होतात ते त्रीलोक्याचे ही गुलाम होतात असे प्रतिपादन महामंडलेश्वर परमानंद गिरी महाराज यांनी केले आहे.

तालुक्यातील कान्हेगाव येथे जपाणुष्ठाण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून प्रवचन प्रसंगी ते भाविकांना उपदेश करतांना ते बोलत होते.



जो मनाच्या मायाजालात गुंततो त्यांना काळ खातो.जे आई वडिलांना सांभाळत नाही,पत्नीचा सन्मान करीत नाही, मुलांना शिक्षण व चांगले संस्कार देत नाहीत. त्यांचा हा समाज तिरस्कार करतो. व्यसन करणारांची निंदा होते. जगात अनेक संत झाले. त्यांचे ध्येय एकच असते भगवंताचे दर्शन व्हावे. संताची वाणी ऐकल्याने व दर्शनाने पापी माणसांचा उध्दार होतो. आपल्या कुळाचा, गावाचा, देशाचा उध्दार झाला पाहिजे. ईश्वराच्या भजनात आणि संताच्या संगतीत सुख आहे असे महाराजांनी यावेळी सांगितले.

सदर सत्संग प्रसंगी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी वारी, भोजडे, रामवाडी, संवत्सर,धोत्रे,तळेगाव, अंदरसुल, सडे आदीसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किसन काजळे, संदीप काजळे, अशोक काजळे, संदीप वाळुंज, आप्पासाहेब काजळे, राजेंद्र सांगळे, वसंतराव भाकरे, अरुण भाकरे यांचेसह सर्व तरुण मंडळ परिश्रम घेत आहेत.

# मान्सून पूर्व तयारी बाबत नागरिक अनभिज्ञ

### प्रशासनाने पूर्वतयारीची माहिती देण्याची मागणी

**अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुका हा चेरापुंजी म्हणून ओळखला जातो. या तालुक्यात पावसाचे प्रमाण जास्त असते. पावसाचे दिवस जवळ येत असून मान्सून पूर्व तयारी बाबत अद्याप ही कोणतीही तयारी प्रशासनाने केली आहे त्याबाबत नागरिक अनभिज्ञ असून प्रशासनाने के पूर्वतयारी केली हे नागरिकांना माहिती करावे अशी मागणी नागरिक करीत आहे.

निसर्ग हा लहरी झाला असून कोणत्या वेळी कोणता प्रसंग येऊ शकतो हे माहीत नाही. प्रसंग आल्यानंतर त्यावर उपाययोजना करून काहीही उपयोग होत नाही. अनेक संकटांना सामोरे जाण्यापूर्वी त्यावर खबरदारी म्हणून काही ठोस उपाययोजनांचे नियोजन करणे आवश्यक आहे.



वादळ, वारे, पावसाचा जोर, या अतिवृष्टी,पाणी साठणे, गटारी तुंबने, झाडे पडणे, विजेच्या तारा तुटणे, पूर परिस्थिती निर्माण होणे, वादळी वाऱ्याने घरांची छपरे उडणे, वाहतूक कोंडी, पिकांचे होणारे नुकसान, अतिवृष्टी झाल्यास त्यामुळे होणारे नुकसान, आदिवासी भागात मागचा अनुभव घेऊन होणारे नुकसान कसे टाळता येईल यासाठी उपाय योजना करणे, सर्वांना धान्य, थंडी पासून संरक्षण वगैरे साठी पूर्वतयारी, पशुधन सुरक्षितता, निवारागृहाची व्यवस्था, अडचणीच्या ठिकाणी वाहतूक व्यवस्था, पंचनामे तातडीने व्हावे यासाठीची यंत्रणा, डास निर्मूलन, अस्वच्छ पिण्याचे पाणी, नाले सफाई, गटारी तुंबून दुकानात पाणी शिरणे, भुस्सखलन शक्यता असलेल्या गावांची यादी तयार असणे आवश्यक आहे. कोणत्या वेळी कोणतीही घटना घडू शकतात. रस्ते, नदी नाल्यावरील पूल आणि आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावणे, रस्ते, पुलांचे निरीक्षण करून त्याबाबत योग्य ती खबरदारी घेणे, धोकादायक इमारतीबाबत योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे, आरोग्य विभागामध्ये सर्व औषधे, सर्पदंशाची इंजेक्शन, आजारी व्यक्तींना नेण्या-आणायची व्यवस्था, वगैरेची तयारी, आहे ते कर्मचारी जागेवर राहणे, असे विविध प्रश्न आहेत.अकोले तालुक्यात कोल्हार घोटी रस्त्यावर मोठं मोठे होर्डिंग्ज लागलेले आहे. त्याबाबत काळजी घेणे असे अनेक प्रश्न असून त्याबाबत प्रशासनाने कोणती तयारी केली. आपत्ती व्यवस्थापन पथके तयार केली आहेत का? आपत्ती व्यवस्थापन साहित्य यादी, सर्व विभागांच्या प्रमुखांच्या बैठकी घेऊन त्यांना काही सूचना दिल्या आहेत का? अशासकीय संस्था, सामाजिक संस्था, स्वयंसेवक यांच्याशी संवाद, बैठक, त्यांची यादी तयार केली का? प्रत्येक टप्प्यावर एस. पी. तयार करणे गरजेचे आहे. याबाबत कोणतीही माहिती नागरिकांना नाही.नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण राहणार नाही यादृष्टीने प्रशासनाने मान्सून पूर्व तयारीची माहिती नागरिकांना द्यावी, अशी मागणी नागरिक करताना दिसत आहे.

## ईव्हीएमच्या स्ट्रॉग रूम परिसरात तिहेरी पोलिसांचा तगडा बंदोबस्त

**नगर । वीरभूमी –**

नगर व शिर्डी लोकसभा मतदार संघातील उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये सीलबंद झाले आहे. ईव्हीएम यंत्रे वाहनातून नगर एमआयडीसीतील वखार महामंडळाच्या गोडाऊनमध्ये उभारलेल्या स्ट्रॉंग रूममध्ये पोहोचविण्यात आल्या आहेत. ही प्रक्रिया सोमवारी रात्रीपासून मंगळवारी (दि. १४) दुपारपर्यंत अत्यंत सुरक्षितपणे पार पडण्यात आली. स्ट्रॉग रूमपरिसरात तिहेरी पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. याशिवाय स्ट्रॉगरूमवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असणार आहे.

दरम्यान मंगळवारी दुपारी स्ट्रॉगरूममध्ये सर्व मतदान यंत्रे उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या समक्ष सील करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, अतिरिक्त जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सोमवारी अहमदनगर व शिर्डी लोकसभेसाठी किरकोळ घटना वगळता शांततेत मतदान पार पडले. मतदान झाल्यानंतर रात्री ईव्हीएम मशिन त्या त्या विधानसभा मतदार संघातील स्ट्रॉंग रूममध्ये आणण्यात आल्या होत्या. त्या ठिकाण ईव्हीएम मशिनची मोजणी करून त्या व्यवस्थित सीलबंद करण्यात आल्या. तेथून त्या ईव्हीएम मशिन नगर एमआयडीसीतील वखार महामंडळाच्या गोडाऊनमधील स्ट्रॉगरूममध्ये आणण्यात आल्या. ही सर्व प्रक्रिया मंगळवारी दुपारपर्यंत सुरू होती. जिल्हाधिकारी सालीमठ, अतिरिक्त जिल्हाधिकारी कोळेकर, अधीक्षक ओला, अपर अधीक्षक खैरे यांच्या उपस्थितीत सर्व मशिन दुपारी सीलबंद करून स्ट्रॉगरूममध्ये ठेवण्यात आल्या आहेत.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# जास्त वृक्षांमुळे संगमनेरकरांना उन्हाळ्यात मोठा दिलासा

## वृक्षराईमुळे संगमनेर शहरवासीयांना उकाड्यापासून दिलासा । वृक्षांचे शहर म्हणून संगमनेरची ओळख : सौ. तांबे

**संगमनेर । वीरभूमी –**
यावर्षीचा उन्हाळा हा अत्यंत कडक आहे. वातावरणातील बदलामुळे तापमान खाली आले असले तरी मागील आठवड्यापर्यंत ४२ अंशापर्यंत तापमान असतानाही संगमनेर शहरात असलेल्या घनदाट वनराईमुळे व विविध वृक्षांमुळे शहरातील नागरिकांना या उखाड्यापासून दिलासा मिळाला असून शहराचे तापमान ३५ अंश सेल्सिअस पर्यंत राहिले. असून विविध वृक्षांमुळे संगमनेर शहर हे झाडांचे शहर म्हणून ओळखले जात असल्याचे दंडकारण्य अभियानाच्या प्रकल्प प्रमुख व नगराध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे यांनी म्हटले आहे.

काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात व मा. आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहराच्या नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे यांनी स्वच्छ व सुंदर संगमनेर शहराबरोबरच शहरात अनेक ठिकाणी हजारो वृक्षांचे रोपण केले. दंडकारण्य अभियानांतर्गत मोकळ्या जागेत, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व संगोपन झाल्याने संगमनेर शहर हे झाडांचे शहर म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

आगामी काळातील उष्णतेचा धोका लक्षात घेऊन दुर्गाताई तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली हीट ॲक्शन प्लॅन राबवत संगमनेर शहरात नगरपरिषदेने २५ गार्डन निर्माण केले. त्यामध्ये झाडे, लॉन, फुलझाडे, तसेच म्हाळुंगी, नाटकी, व प्रवरा या नद्यांच्या किनारपट्ट्यांवर अनेक वृक्ष लागवड केली आहे. यामुळे हा परिसर हिरवाईने फुलला आहे. तसेच प्रत्येक रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण असल्याने भर उन्हाळ्यात रस्त्यावर मोठी सावली दिसत आहे.





ग्रामीण भागातून आलेल्या नागरिकांना या सावलीचा मोठा दिलासा मिळाला. तसेच संगमनेर शहरातील तापमान कमी करण्यामध्ये या वनराईचा मोठा वाटा राहिला. महाराष्ट्रातील तापमान ४४- ४५ अंश सेल्सिअस वर गेले असताना संगमनेर तालुक्यामध्येही ४२ अंशापर्यंत तापमान गेले. मात्र दंडकारण्य अभियानातून गावोगावी झालेले वृक्षारोपण आणि वृक्ष संस्कृती बाबत जाणीव जागृती यामुळे संगमनेर तालुक्याचे तापमान इतर तालुक्यांच्या तुलनेत कमी राहिले.

त्याचबरोबर संगमनेर शहरातही या वृक्षांमुळे चार ते पाच अंश सेल्सिअसने तापमान कमी झाल्याने उकाड्यापासून शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. गर्द सावली बरोबर शुद्ध ऑक्सिजन देणाऱ्या या झाडांमुळे संगमनेर शहर थंड हवेचे ठिकाण व ऑक्सिजन युक्त शहर म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. यासाठी विविध सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेतला. अनेक ठिकाणी झाडे लावण्याबरोबर त्यांचे संगोपन, ट्री गार्ड लावून झाडी वाढवणे, फुल झाडे लावणे, रस्त्यांच्या मधोमध व दुतर्फा वृक्षारोपण, मोठ मोठ्या झाडांचे संगोपन, यामुळे संगमनेर शहर हे हिरवाईने दाटलेले झाडांचे शहर दिसत आहे. या विविध झाडांमुळेच शहराची सुंदरता वाढत असून या झाडांमुळे उष्णता कमी होण्याबरोबर ऑक्सिजनचे प्रमाण वाढले आहे.

### वृक्ष संवर्धन संस्कृती ही संगमनेर ची ओळख : दुर्गाताई तांबे

थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या दंडकारण्य अभियानातून संगमनेर शहरात अनेक ठिकाणी हजारो झाडे लावली. ही झाडे आता मोठी होत असून शहरांमध्ये वृक्षांचे संगोपन व संवर्धन ही संस्कृती वाढली आहे. यामध्ये नागरिकांचा मोठा सहभाग असून मागील अनेक दिवसांच्या कामातून स्वच्छ व सुंदर संगमनेर बरोबर हरित संगमनेर निर्माण झाले आहे. आगामी काळात संगमनेर हे थंड हवेचे शहर होईल असा विश्वासही दुर्गाताई तांबे यांनी व्यक्त केला असून यामध्ये नागरिकांचा मोठा सहभाग असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# काजवा महोत्सवासाठी भंडारदरा परिसर सज्ज

**अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या परीसरातील कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात काजवा महोत्सवात यावर्षी पर्यटकांनी हाऊसफुल गर्दी होणार असुन या महोत्सवाची अगोदरच बुकींग फिक्स झाल्या असुन काजव्यांसाठी भंडारदरा सजला आहे.




अकोले तालुक्यातील पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वतरांगेत असणाऱ्या कळसुबाई हरिश्चंद्रगड अभायाण्यात पावसाळ्याच्या अगोदर काजव्यांची चमचम सुरु होत असते. ही काजव्यांची चमचम म्हणजे पावसाची चाहुल असते. हिरडा, बेहडा, सादडा यासारख्या झाडांवर स्वयंप्रकाशित काजवा किटक कोट्यावंधींच्या संख्येने एकाच वेळेस लयपद्ध पद्धतीने चमकत असतात. हा काजव्यांचा चमत्कार बघण्यासाठी दरवर्षी २५ मे ते १५ जुनपर्यंत हजारो पर्यटक भंडारदऱ्यात दाखल होत असतात . याही वर्षी काजव्यांची चमचम वेळेवर सुरु होण्याची शक्यता असुन अनेक पर्यटकांनी आपल्याला काजव्यांचा हा करिष्मा व्यवस्थित बघता यावा म्हणुन टेंट धारक व हॉटेल मध्ये डव्हॉन्स बुकींग केली आहे. तर काही ऑर्गनायझर्ससे काजवा महोत्सवामध्ये वेगवेगळे इव्हेंट आयोजित केले आहेत. अनेक आयोजकांनी पर्यटकांना काजवा महोत्सवात आकर्षित करण्यासाठी सोशल मिडीयाचा आधार आपली जाहीरात केली आहे.

काजवा महोत्सवासाठी होणारी गर्दी लक्षात घेता वनविभागाकडुन जोरदार तयारी सुरु असुन पर्यटकांना काजव्यांचा व्यवस्थित आनंद घेता यावा म्हणुन अभयारण्यातील असणाऱ्या प्रत्येक गावातील सदस्यांची आढावा बैठकही आयोजित केली गेली असल्याचे खात्रीलायक वृत्त हाती आले आहे . तर भंडारद-यातील हॉटेल आनंदवन, हॉटेल यश, हॉटेल अमृतेश्वर, हॉटेल पंचशिल, हॉटेल न्यु समाधान, महाराष्ट्र पर्यटन निवास यांनीही पर्यटकांना काजवा महोत्सवात आकर्षित करण्यासाठी विशेष सवलती दिल्या असुन अनेक टेंटधारकही सवलतीच्या दरात काजवा बुकींग करत आहेत . कोरोनाचे सावट आता पुर्णपणे नाहीसे झाल्याने गत तीन ते चार वर्षापासुन काजवा महोत्सव जोमाने सुरु झाला असुन यावर्षी भंडारदऱ्याचा काजवा महोत्सव हाऊसफुल होणार आहे.

# नगर दक्षिणसाठी ४ हजार ३५७ पोस्टल मतदान

## ४ जून रोजी सकाळी ७.५९ मिनीटापर्यंत करता येणार मतदान

**नगर । वीरभूमी –**
निवडणुकीच्या कामात सहभागी होत जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यात कर्तव्य बजावणाऱ्या, नेमणुकीस असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांसह अन्य शासकीय विभागातील अधिकारी कर्मचारी, तसेच सैनिक मतदार असणाऱ्या (ईटीपीबीएस प्रणालीव्दारे मतदान करणाऱ्या) ४ हजार ३५७ मतदारांनी पोस्टल मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवला आहे. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील पोस्टल मतदानाची ही आकडेवारी आहे.



दरम्यान, सैनिक मतदार असणाऱ्या ईटीपीबीएस प्रणालीव्दारे मतदानाच्या प्रक्रियेत सहभागी होता येणार असून यासाठी त्यांना मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच ४ जूनला सकाळी ७ वाजून ५९ मिनीटापर्यंत मतदान करून त्यांची मते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यापर्यंत विहित मागनि पाठवता येणार आहे. ४ जूनला सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरूवात होणार असून त्या आधी एक मिनीटापर्यंत सैनिकांना प्रणालीव्दारे मतदान करता येणार असून ते मोजणीच्या आधी स्वीकारले जाणार असल्याची माहिती नगर लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावतीने देण्यात आली.

नगर लोकसभा मतदारसंघातील पोस्टल मतदानाची ही आकडेवारी असून यात ८५ वर्षाचे ज्येष्ठ किंवा ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांग असणाऱ्या ७४८ मतदारांपैकी ६९४ मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवला आहे. यासह सैनिक म्हणून कार्यरत असणार्या ७ हजार ६८ मतदारांपैकी ६८७ मतदारांनी प्रणालीव्दारे मतदान केलेले असून ही प्रक्रिया ४ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. यासह नगर लोकसभा मतदारसंघात असलेले मात्र १३ मे रोजी शिर्डी लोकसभा मतदारसंघात निवडणूक कर्तव्यावर असलेले मतदारांपैकी १ हजार १७८ मतदारांचे मत नगर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. तसेच नगर लोकसभा मतदारसंघातर्गत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर असणाऱ्या मतदार सुविधा केंद्रांत ८९२ मतदारांनी टपाली मतपत्रिकेव्दारे मतदान केलेले आहे. यासह अन्य मतदारसंघात कर्तव्यावर असणारे ९०६ असे एकूण ४ हजार ३५७ पोस्टल मतदारांचे मत निवडणूक यंत्रणेला मिळालेले आहे.

तसेच मुळचे नगर लोकसभा मतदारसंघात असणारे मात्र, १३ मे रोजी जिल्ह्यातील शिर्डी यासह नांदूरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरूर, शिर्डी, औरंगाबाद आणि बीड या जिल्ह्यातील मतदारसंघात नगरचे शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस हे कर्तव्यावर असल्याने त्यांना पोस्टल प्रक्रियेव्दारे मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले आहे.

# समता पतसंस्थेची ३९ वी सर्वसाधारण सभा उत्साहात

## वेळेवर आर्थिक पत्रके जाहीर करणारी समता पतसंस्था महाराष्ट्रातील सर्व प्रथम व एकमेव पतसंस्था ठरली : काका कोयटे

**कोपरगाव । वीरभूमी –**
समता नागरी सहकारी पतसंस्थेची ३१ मार्चला दुपारी ३ वाजता अन् ऑडिटेड बॅलन्स शीट आणि ११ मे ला ऑडिटेड बॅलन्स शीट जाहीर केली जात असतात. या बाबत कोणत्याही प्रकारची ॲडजस्टमेंट न करता, कमीत कमी शाखांमध्ये वेळेवर आर्थिक पत्रके जाहीर करणारी समता पतसंस्था महाराष्ट्रातील सर्व प्रथम व एकमेव पतसंस्था ठरली असल्याचा आम्हाला अभिमान वाटतो अशा प्रकारचे उद्गार समता नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी काढले.

समता नागरी सहकारी पतसंस्थेची ३९ वी सर्व साधारण सभा स्व.यशवंतराव चव्हाण समता सहकार सभागृहात संस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात उत्साहात संपन्न झाली. त्या वेळी ते बोलत होते.

तसेच संस्थेचे संचालक संदीप कोयटे यांनी समता लिक्विडिटी बेस्ड प्रोटेक्शन स्कीम विषयी सविस्तर माहिती देत समतात ९९.८१ टक्के ठेवीदारांच्या ठेवी प्रत्येकी ३५ लाख रुपयांपर्यंत पूर्णपणे सुरक्षित असल्याचे सांगितले तर जनरल मॅनेजर सचिन भट्टड यांनी ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इति वृत्तांत सांगितला. तसेच कोपरगाव नगरपालिकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज पापडीवाल नायब तहसीलदार चंद्रकांत कुलथे यांच्या उपस्थितीत संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांनी मतदान करण्याची शपथ घेतली.

नाशिक येथील संस्थेचे सभासद शाम झारेकर, कोपरगाव येथील चंद्रकांत शिंदे, गौरव अग्रवाल, रंगनाथ सूर्यवंशी स्वप्निल बाफना, किशोर कुलकर्णी, आकाश मिश्रा, तिलकशेठ अरोरा, रुपेश शिरोडे, अरिफ अत्तार अकबर शेख, सिराज अत्तार या सभासदांचा संस्थेच्या संचालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना चंद्रकांत शिंदे म्हणाले की, समता ही एक वेगवेगळ्या व्यक्तींच्या अवयवांपासून बनविलेली एक सुदृढ रचना आहे. काका कोयटे संस्थेचा मेंदू, संचालक डोळे, छोटा मेंदू, अधिकारी, कर्मचारी हात, पाय, रक्तवाहिन्या आहे तर ठेवीदार हे फुफ्फुस असून हे हृदय कर्जदार आहे. हे सगळे अवयव चांगले काम करत असल्यामुळेच समता भक्कम स्थितीत आहे.

हृदयाला काही आजार झाला तर त्यासाठी समताची डॉक्टरांची टीम असते. वेगळ्या प्रकारे हृदयावर म्हणजेच कर्जदारावर चांगल्या प्रकारे उपचार करून हृदयाची काळजी घेत असते. तसेच फुफ्फुस म्हणजे ठेवीदार यांना ही उत्कृष्ट सेवा देत असते. दोघांमध्ये समन्वय साधत समताचे नाव संस्थेचे चेअरमन काका कोयटे यांनी परदेशातही पोहोचविले आहे.




या सर्वसाधारण सभेला संस्थेचे संचालक जितुभाई शहा, अरविंद पटेल, चांगदेव शिरोडे, रामचंद्र बागरेचा, संदीप कोयटे, गुलशन होडे, कांतीलाल जोशी, कचरू मोकळ, बोर्ड सेक्रेटरी संतोष मुदबखे, कोपरगाव नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा सौ. सुहासिनी कोयटे, सौ. ज्योत्स्ना पटेल, संस्थेचे ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार संजय पारखे यांनी मानले.